# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र-९६** **दिनांक - १८/०३/२०२४**

## बांगलादेशी वेश्यादलालच्या ताब्यातुन दोन पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.

दि. १५/०३/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बांगलादेशी वेश्यादलाल नामे सुलतान उर्फ मोहम्मद आलमगिर अब्दुल मोजीत मंडल व त्याचे दोन साथीदार सर्व रा. चार बंगला, वर्सोवा, अंधेरी पश्चिम असे वेश्यादलाल असुन त्यांच्याशी गिऱ्हाईकांनी फोनद्वारे संपर्क साधला की, ते वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकास मुंबई, ठाणे, काशिमीरा व मिरा-भाईंदर या परिसरातील लॉजमध्ये रुम बुक करावयास लावुन शॉर्ट टाईमसाठी एका मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला व त्यांचे कमीशन असे एकुण १५,०००/- रु घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन पाहिजे आरोपी वेश्यादलाल यांनी सांगितल्याप्रमाणे ठाकुर मॉलसमोर अजित पॅलेस हॉटेलच्या बाजुस असलेल्या फुटपाथवर, मुंबई-अहमदाबाद सर्व्हिसरोड, पेणकरपाडा, काशिमिरा या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १६.४५ वा. छापा टाकला असता, दोन पाहिजे आरोपी वेश्यादलाल व त्यांचा साथीदार सुलतान उर्फ मोहम्मद आलमगिर अब्दुल मोजीत मंडल, वय ३८ वर्षे, सर्व सध्या रा. चारबंगला, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुळ रा. बांगलादेश यांनी आपआपसात संगणमत करुन दोन पिडीत मुलींना वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम मो.आलमगीर उर्फ सुलतान मंडल याचे मार्फतीने स्वीकारली तसेच ताब्यातील आरोपी नामे मो. आलमगीर उर्फ सुलतान मंडल हा पारपत्र व व्हिसा शिवाय भारतात अनाधिकृतपणे प्रवेश करुन वर्सोवा, अंधेरी प. परिसरात गेले ०४ महिन्यापासुन वास्तव्य करीत असल्याचे सांगितल्याने त्यास सापळयातील मुद्देमालासह ताब्यात घेवुन दोन पिडीत मुलींची सुटका केली. सदर बाबत सफौ/९५००८ रामचंद्र शिवाजी पाटील यांनी दोन पाहिजे आरोपी वेश्यादलाल व ताब्यातील वेश्यादलाल सुलतान उर्फ मोहम्मद आलमगिर अब्दुल मोजीत मंडल, वय ३८ वर्षे यांचेविरुध्द सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I १९८/२०२४, भा.द.वि.स कलम ३७० (३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ सह परकीय नागरीक १९४८ आदेशाचे कलम ३ (अ) सह परकीय नागरीक अधिनियम १९४६ चे कलम १४ (अ) प्रमाणे दिनांक १६/०३/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.